ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# धर्मसुधारक व धर्मचिंतक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

* डॉ. नवनाथ रासकर,

*तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मुधोजी महाविद्यालय फलटण

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे गत शतकातील विख्यात इहवादी-बुद्धीवादी विचारवंत होते. सर्व प्रकारच्या सुधारणांमध्ये धर्मसुधारणा ही पायाभूत-मूलभूत अशी सुधारणा आहे. एकंदर सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक त्या त्या सुधारणा त्या त्या क्षेत्राशी संबधीत असतात. एखाद्या झाडाची फांदी काढून किंवा तीला छेद घेऊन तिच्या जागी नव्याने कलम करण्यासारखी अशी ही गोष्ट असते. पण धर्मसुधारणेचे तसे नसते ती झाली तर इतर सुधारणा तिच्याबरोबरीने होतात. अशा पद्धतीने किंवा दृष्टीतून विचार करणारांमध्ये तर्कतीर्थांचा समावेश होतो. त्यांची संपूर्ण हयात धर्मचिंतनाच्या पर्यायाने समाजसुधारणेच्या क्षेत्रात गेली. धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर गावात तर्कतीर्थांचा जन्म २७ जानेवारी १९०१ मध्ये झाला. त्यांचे मोठे बंधू वेणीमाधव शास्त्री हे विख्यात आयुर्वेदाचार्य होते. तर्कतीर्थांचे शिक्षण काही काळ वाई येथील प्राज्ञपाठशाळेत झाले. वेद-उपनिषदे, रामायण, महाभारत, पुराणे आदि प्राचीन साहित्य त्यांनी सहज आत्मसात केले. त्यानंतर ते कलकत्याला गेले आणि तर्कतीर्थ ही न्यायशास्त्राशी व संस्कृतशी संबंधीत प्रतिष्ठीत अशी पदवी संपादन केली. याच नावाने त्यांची भारतभर ओळख होती. काशी, वाराणसीतही त्यांनी काही काळ अध्ययन केले. दरम्यानच्या काळात त्यांनी सामाजिक, राजकीय क्षेत्रातही सहभाग घेतला. स्वातंत्र्याचे वारे आणि त्यांच्या विचारांना फुटलेले धुमारे यांचा संयुक्त परिणाम म्हणून नव्या समाजाची - नव्या भारतीय समाजाची स्वप्ने आपल्या नवविचारांच्या माध्यमातून ते पाहू लागले. स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतल्याने त्यांना दोनदा कारावासही झाला. (१९३०-३२) तर्कतीर्थ हे मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराचे पाईक असल्याने त्यांच्या पक्षातही त्यांनी काम केले. कॉंग्रेसशीही त्यांचा संबंध होता. म.गांधींच्या अस्पृश्यता निवारणाच्या भूमिकेचे समर्थनही त्यांनी वेळोवेळी केल्याचे दिसते. धर्मनिर्णय मंडळाच्या (स्थापना १९३८) धर्मसुधारणेच्या कार्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. याच भूमिकेतून त्यांनी धर्मकोशाचे संपादन करुन अवघड असे कार्य केले. त्यांनी धर्मसुधारणा केवळ चिंतनाच्या माध्यमातून नव्हे तर कृतीरुपांतही अनुसरल्या व सुचविल्या आहेत. अनेक सभा-संमेलनातून तर्कतीर्थांनी कृतीकार्यक्रमावर भर दिल्याचे दिसते. एकंदर त्यांच्यावर भारतीय

ISSN–2277- 8721

EIIRJ — Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II    Nov – Dec 2022

OPEN ACCESS    Original Research Article

आणि पाश्चात्य प्रबोधनाची परंपरा त्यातील चिंतन व समाज सुधारणाविषयक विचार यांचा प्रभाव होताच पण तत्कालीन मानवेंद्रनाथ रॉय, मार्क्स, म.गांधी आणि काँग्रेसची समयोचित विचारधारा या सगळ्यांचा प्रभाव होता. पण त्यामध्ये प्रामुख्याने त्यांच्यावर भौतिकवादी विचारांचा अधिक प्रभाव होता. भौतिकवाद आणि बुद्धिवाद यांच्या प्रभावछायेतून त्यांची वाटचाल झालेली दिसते. तरीही त्यांच्या ठिकाणी गांधीवादी अध्यात्म की जे मूल्यनिष्ठ होते तेही अनुभवाने व चिंतनाने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग झाले होते. असे त्यांचे जीवन चरित्र सांगते.म्हणूनच या लेखात धर्मसुधारक व धर्मचिंतक या त्यांच्या दोन महत्वाच्या पैलुंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

### ✻ धर्मसुधारक :

जरी ते प्रामुख्याने कठोर बुद्धीवादी व जडवादी असे विचारवंत होते तरी त्यांच्यात एक धर्मसुधारकही होता. धर्मसुधारक हा नेहमी समाजाच्या पुढे पण त्याच्या (समाजाच्या) गतीने चालत असतो. १९२३ मध्ये सोनगीरच्या धर्मसभेत सनातन्यांची जी काही भूमिका होती ती नाकरुन पुरोगामी भूमिका घेतल्याचे दिसते. त्यांनी 'धर्मग्रंथांचा काळजीपूर्वक तपास केल्यास धर्म पालटत (बदलत) गेल्याचे कोणत्याही संयमी माणसाला कळून यावे' असे आपले मत नोंदविले आहे. धर्माचे सनातन स्वरुप बदलता येत नाही, ती ईश्वरी किंवा अपौरुषेय आहे. त्यामध्ये मानवी बुद्धी ढवळाढवळ करु शकत नाही. अशी सनातन्यांची भूमीका होती. तर्कतीर्थ मात्र धर्माचे स्वरुप बदलत गेल्याचे सांगून हा बदल मानवी बुद्धीचा भाग आहे असे सांगतात व धर्म हा मानवनिर्मित आहे असे अधोरेखित करतात. ऐतिहासिक पद्धतीचा स्वीकार करुन धर्म सुधारणा करता येते असे सांगून वेद मानवनिर्मित आहेत असा निर्वाळा सोनगीरच्या सभेत त्यांनी दिला. धर्मनिर्णय मंडळाच्या माध्यमातून प्रौढ विवाह पद्धती, विधवा विवाह आणि त्यांची अंमलबजावणी याला महत्व देण्यात आले. स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या नेतृत्वाखाली तर्कतीर्थ आणि मंडळ इतर विद्वानांनी धर्म सुधारणेचे मोठे कार्य केले. अर्थात स्वातंत्र्य लढ्याच्या धामधुमीत या व अशा इतर सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी यांच्या कार्याकडे दुर्लक्ष झाले किंवा त्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही, असो,

म. गांधींनी त्यांचा मुलगा देवदास व राजगोपालाचारी या तत्कालीन बड्या नेत्याची कन्या 'लक्ष्मी' या

दोहोंचा विवाह तर्कतीर्थांच्या पौरोहित्याखाली लावून दिला. ह्या आंतरजातीय विवाहाला सनातनी मंडळींनी विरोध दर्शविला होता. गांधींनी यासाठी तर्कतीर्थांना शास्त्राधार विचारला होता. यावर त्यांनी म.गांधींची मूल्ये-आचार राजगोपालाचारींच्या प्रमाणेच आहेत. त्यामुळे त्यांचे वर्ण समान मानावे लागतील असे सांगितले. शिवाय हा विवाह स्वतः धर्मनिर्णय मंडळींच्या संस्कार विधीतून लावून दिला. त्यांनी त्यावेळी जाती व्यवस्था

काल्पनिक तर वर्णव्यवस्था कर्ममूलक आहे असा शास्त्राधार दिला.

सोरटी सोमनाथ मंदीराचा जीर्णोद्धार करुन ते सर्व जाती-धर्माच्या लोकांसाठी खुले केले जाणार होते. पण या

कार्यक्रमासाठी जीर्णोद्धाराच्या-मंदीराच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यावेळचे सनातनी पंडीत तयार नव्हते. तो काळ १९५१ चा होता. मग त्या मंदीराच्या व्यवस्थापनाने तर्कतीर्थांना मंदीरे प्रतिष्ठापनेसाठी पौरोहित्यासाठी विचारले. ते त्यांनी स्वीकारले. पौरोहित्य ही एक कृती तशी धार्मिकच होती. एका अर्थाने कर्मकांडच होते. शिवाय तर्कतीर्थांच्या भौतिकवादी बुद्धीवादाच्या चौकटीत न बसणारे असे काम होते. पण त्यांनी ते स्वीकारले कारण हे कार्य धर्मसुधारणेचे होते.

रशियात झालेल्या धर्मसभेत (१९३९) सर्व धर्मातील काही महत्वाच्या तथ्यांचा समन्वय करुन राष्ट्रांचे संबंध सुधारता येतील असे आपले मत म.गांधीच्या धर्मसमन्वयाच्या भूमिकेतून सांगितले. वाराणसीला १९२८ मध्ये अखिल भारतीय ब्राह्मण महासंमेलनात तर्कतीर्थांनी अशीच सुधारणावादी भूमिका घेतली होती. या सभेत विवाहासाठीचे कन्येचे वय, जाती अशा विषयांवर चर्चा झाली. ब्राह्मणांमधील पोटजाती ह्या केवळ उपाधी आहेत आणि त्याला तसा शास्त्राधार आहे असे सांगितले. काट्याने काटा काढणे असे त्यांच्या धर्मसुधारणेच्या भूमिकेबाबत म्हणता येईल.

अशा तऱ्हेने तर्कतीर्थांनी सामाजिक जीवन व्यवहारात धर्मसुधारक अशी भूमिका पार पाडल्याचे दिसते. ही भूमिका बजावत असताना आपल्या वैयक्तिक जडवादी बुद्धीवादी भूमिकेला मात्र मूरड घातली. ज्याप्रमाणे आई बाळाच्या पावलांनी चालते त्याचप्रामणे महापुरुष, विचारवंत स्वतःच्या भूमिकेला सामाजिक जीवनात बाजूला ठेवतात आणि जनसामान्यांच्या भूमिकेतून वाटचाल करतात. समाजातही तसेच वावरतात. खऱ्या धर्म-समाज सुधारणेची भूमिकाही अशीच असते. वरील विवेचन किंवा दोनचार उदाहरणे देवून धर्मसुधारण्याची त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. अर्थात हे विवेचन, त्यासाठी वापरेली उदाहरणेही वानगीदाखल आहेत. आता त्यांचे धर्मचिंतन समजून घेवू.

* **धर्मचिंतक :**

वर सांगितल्याप्रमाणे तर्कतीर्थांच्या धर्मचिंतनाला बुद्धीवादाची भौतिकवादाची पार्श्वभूमी आहे. त्यांच्यावर उपरोक्त म्हटल्याप्रमाणे एम.एन.रॉय, मार्क्सचा प्रभाव असल्याने त्यांचे धर्मचिंतन धारधार झाले आहे. वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात ते बुद्धीवादीच होते. मूर्तीपूजा व अनुशंगिक कर्मकांड त्यांना त्यांनी आपल्या जीवनातून हद्दपार केले होते. डॉ.आंबेडकरांप्रमाणेच सर्व सामान्यांना असणारी धर्माची गरज त्यांनी ओळखली होती. डॉ.आंबेडकर धर्मवादी म्हणून नव्हेतर धर्मसुधारकाच्या भूमिकेतून सामान्यांना धर्माची गरज आहे, ती त्यांना आशावादी ठेवती असे सांगताना दिसतात. वैयक्तिक पातळीवर त्यांना त्याची गरज नव्हती

खरे तर त्यांनी धर्म-ईश्वर आदी गोष्टी नाकारल्या होत्या, याच धर्तीवर तर्कतीर्थांना समजून घेता येईल. त्यांच्या धर्मचिंतनाचा मागोवा घेताना ते तीन टप्प्यातून झाल्याचे दिसते. पहिला टप्प्यात ते ‘आनंदमीमासा’

(१९३८) या ग्रंथातून वैदिक काळातील प्रवृतीवादाच्या अनुशंगाने येणारा ‘आनंद’ अधोरेखित करतात. त्यांच्या मते वैदिक काळात ऐहिक जीवनाला मानवी मन, शरीर आणि समाज यांना महत्व होते कारण मानवी जीवनच नव्हेतर संपूर्ण विश्वच आनंदमय आहे असा विचार त्या काळात होता. या जीवनपद्धतीने समाजाची खरी प्रगती होत असते. समाज गतीशील आणि चैतन्यशील राहती.

दुसऱ्या टप्प्यावर ‘हिंदुधर्माची समीक्षा’ करताना त्यांनी आपली वरील भूमिका बदललेली दिसते.

ही भूमिका जडवादाकडे झुकणारी होती. यातून ते हिंदू धर्म किंवा एकूण धर्म नावाची संस्थाच नाकारतात. मार्क्सवादी भूमिकेतून त्यांनी धर्मसंस्था नाकारली. हे करताना त्यांनी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला. या पद्धतीनुसार धर्माचे इतिहासातील महत्वाचे स्थान लक्षात घेतले जाते. म्हणजेच कधी काळी धर्म आवश्यक होता, आता त्याची गरज संपली आहे.

धर्माची बीजे आदिमानवाच्या काळापर्यंत मागे जातात. प्राथमिक अवस्थेपासून वर्तमानातील सुधारलेले जेवढे मानवी समाज आहेत, त्या सर्वांमध्ये धर्म ही संस्था अस्तित्वात होती. सुरुवातीला ऐहिक गरजेतून धर्म उदयाला आला. नंतर माणूस स्थीर झाल्यावर निवांतपणा लाभल्यावर परलोकवादी धर्म उदयाला आले. यावेळचा मानवी प्रश्न मरणोत्तर जीवनाशी संबंधीत होता. धर्माची अशी चिकित्सा करुन तर्कतीर्थांनी समाजधारणेसाठी किंवा मानवी जीवन सार्थकी लागण्यासाठी ईश्वर, आत्मा परलोकादि गोष्टींची गरज नसते, असे सांगितले. परलोकवादी मूल्यांपेक्षा ऐहिक मूल्येंच मानवी जीवन संपन्न व समृद्ध करु शकतात

असे त्यांचे मत होते. आता धर्म संस्थेपेक्षा उच्चतर सामाजिक संस्था उदयाल येत आहेत. म्हणून सर्व भेदातीत समाजव्यवस्था निर्माण करण्याकडे सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. समाजातील सर्वांच्या गरजा भागतील अशा समाजवादी तत्वावर लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त अशी समाजसंस्था पाहिजे. अशी समाजव्यवस्था, ध्येय आपल्या परंपरेतच आहे. महाभारतकार व्यासांनी मानवी व्यवहाराला, लोकव्यवस्थेला आणि समाजधारणेला महत्व देवून शाश्वत नैतिक मूल्यांनाही सापेक्ष ठरविले. भगवान बुद्धांनी मानवाला केंद्रीभूत ठरविले. वेदांपासून शंकराचार्यांपर्यंत सर्वांनी सत्याच्या समीक्षेचा व संशोधनाचा पाठपुरावा केला. हे लक्षात घेऊन आपण मागे न पाहता, न घुटमळता, भूतकाळात न अडकता पुढे गेले पाहिजे आणि नवीन समाजरचना करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. त्यासाठी विज्ञानाचा आधार घेतला पाहिजले. अशातऱ्हेने फायरबाख, डुरखीम, मार्क्स आदी जडवादी तत्त्वचिंतकांच्या प्रभाव छायेतून धर्माची व त्यातील प्रतिनिधीक/उदाहरणादाखल हिंदू धर्माची चिकित्सा करुन धर्मविरहीत विज्ञानाधिष्ठीत नवसमाजाच्या
दिशेने वर्तमान समाजाने गेले पाहिजे अशी मांडणी या टप्प्यावर करतात.

वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१) या ग्रंथातून आणि नंतर तर्कतीर्थांनी आपली जडवादी, भौतिकवादी भूमिका काहीशी सौम्य करुन मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांवर लक्ष केंद्रीत करुन धर्मातील शाश्वत भाग स्वीकारुन आपण पुढील वाटचाल केली पाहिजे असे सांगितले. म्हणजे नव्या बरीबर जुन्यातील तथ्यपूर्ण भाग स्वीकारणे मानवी हिताचे आहे. अन्यथा स्नानपात्रातील पाण्याबरोबर लहान बालकही फेकून देण्यासारखे ठरेल असे ते सांगतात. इंद्रियनिग्रह, चित्तशुद्धी, सर्वभूतानुकंपना इ. धार्मिक व नैतिक मूल्ये शाश्वत आहेत त्यांना आजच्या यांत्रिक व भौतिकवादी जीवनात मानवी समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्व आहे. विश्वव्यापी संस्कृतीकडे आपली वाटचाल चालू आहे, पण त्यात शाश्वत मूल्यांना अधिष्ठानभूत स्थान असायला हवे ते आवर्जून सांगतात. या तिसऱ्या टप्प्यावर ते सांगतात की, धार्मिक श्रद्धा ही मानवी मनातील गुंतागुंतीची पण समर्थ अशी प्रवृत्ती आहे. त्यामुळेच तीला शाश्वत मूल्यांच्या अनुशंगाने विज्ञानाधिष्ठीत जगात पर्यायाने समाजात स्थान असले पाहिजे असे म्हणताना ते दिसतात.

अशा तऱ्हेने तर्कतीर्थांचे धर्मचिंतन तीन टप्प्यातून घडताना दिसते. हे धर्मचिंतन आनंदमीमांसा, हिंदुधर्मसमीक्षा, सर्वधर्मसमीक्षा, जडवाद, वैदिक संस्कृतीचा विकास आदी पुस्तकातून आणि विविध लेख व भाषणे यांच्या माध्यमातून घडले आहे. एका जीवंत प्रवाही धर्मचिंतकाची भूमिका त्यांच्याकडून वठवली गेली. म्हणूनच त्यांच्या धर्मचिंतनात व्यापकता व धारदारपणा आलेला दिसतो. त्यामुळेच त्यांच्या

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

संदर्भात 'भारतीय प्रबोधनाचा सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी' (द्दश लशीीं ीर्शिीर्ली ष ख्पवळरप ीशपरळीीरपलश) असे एम.एन.रॉय यांनी म्हटले आहे.

**संदर्भग्रंथ :**

➢ हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्म समीक्षा - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - प्राज्ञपाठशाळा, वाई २००५

➢ लेखसंग्रह खंड १, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - श्रीविद्या प्रकाशन पुणे १९८२

➢ वैदिक संस्कृतीचा विकास - - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - प्राज्ञपाठशाळा, वाई १९७२

➢ प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -प्राज्ञपाठशाळा, वाई १९९६ - तर्कतीर्थ, केवल दप्तरी इ.

➢ विश्वकोशातील (मराठी विश्वकोश) नोंदी

**Cite This Article:**

** डॉ.नवनाथ रासकर , (2022)* धर्मसुधारक व धर्मचिंतक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI* (Special Issue-II), 56-61.